<u>**सं.फौ.ख.क्र. ७१३/२०२१**</u>
शासन–वि–किरण रांधवन.
नि.क्र.१४ लगत.

<u>**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ यांची जबानी**</u>
मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – दत्तात्रय वामन कुंभार,
वय – ५३ वर्षे, व्यवसाय – ग्रेड पोलीस उपनिरीक्षक,
राहणार– दौंड पोलीस स्टेशन, जि. पुणे.

<u>**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आधंळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–**</u>

१. दि. ०८.०९.२०२१ रोजी दौंड पोलीस स्टेशन येथे मी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक म्हणुन नेमणुकीस होतो. सदर दिवशी ठाणे अंमलदार पोलिस हवालदार बंडगर यांनी फिर्यादी चंद्रभागा सोपान आटोळे यांची फिर्याद नोंदवून गु.र.क्र.४८७/२०२१ नोंदवून त्याचे तपासकाम माझ्याकडे सोपविला. तपासकामात फिर्यादीचे अवलोकन करुन दि. ०९.०९.२०२१ रोजी घटनास्थळ पंचनामा दोन पंचांसामक्ष तयार केला. घटनास्थळ हे फिर्यादीने दाखविले होते जे पुणे सोलापूर हायवे रोडला उत्तर बाजूला रावणगाव हद्दीत शंभू मावळे यांच्या पडीक जमीन क्षेत्राजवळ होते. आता मला दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा हा तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास <u>**नि.२१**</u> देण्यात येते. त्यानंतर साक्षीदारांच्या सांगण्यानुसार तपास टिपणे नोंदविली. त्यानंतर आरोपी दि. १४.०९.२०२१ रोजी त्याची मोटारसायकल क्र. एम.एच. ४२ बी. सी. ०२८३ घेऊन पोलीस स्टेशनला हजर झाला. त्यानंतर अपघातग्रस्त मोटारसायकलचा दिसत्या परिस्थितीनुसार पंचनामा दोन पंचांसमक्ष केली. आता मला दाखविण्यात आलेला मोटारसायकलचा पंचनामा हा तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास <u>**नि.२२**</u> देण्यात येते. त्यानंतर आरोपीला अटक करुन जामीनावर मुक्त केले. आता मला दाखविण्यात आलेला अटक पंचनामा हा तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आणि आरोपीचा सही, अंगठा व फोटो आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास <u>**नि.२३**</u> देण्यात येते. त्यानंतर मोटारसायकल क्र. एम.एच. ४२ बी. सी. ०२८३ याचा मेकॅनिककडून तपासणी करुन त्याचा अहवाल तपासकामात सामील करुन घेतले आणि मोटारसायकल आरोपीच्या ताब्यात दिले. आता मला दाखविण्यात आलेला मेकॅनिकला तपासणीसाठी शिरसाई ऑटो गॅरेजला दिलेले पत्र तेच आहे. त्यावर माझी व शिरसाईच्या प्रोप्राईटरची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास <u>**नि.२४**</u> देण्यात येते. आता मला दाखविण्यात आलेला पावती तीच आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास <u>**नि.२५**</u> देण्यात येते. त्यानंतर अपघातग्रस्त मोटारसायकलचे कागदपत्र आणि आरोपीचे लायसन्स व फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करुन

तपासकामात समाविष्ट करुन घेतले. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाही. माझ्या तपासकामात पुरावा निष्पन्न झाल्यामुळे त्याच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी गैरहजर. आरोपींचे विधीज्ञ गैरहजर. साक्षीदार हजर असल्याने सरतपास नोंदविण्यात आले आणि उलटतपास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३०९ प्रमाणे सदर साक्षीदाराचा उलटतपास Dispensed With करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः– १३.०१.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.